महाराष्ट्र विकास सेवा गट-अ मधील
अधिकाऱ्यांच्या बदल्या / नियुक्त्या.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन आदेश क्र. मविसे-१०१७/प्र.क्र.७१ (भाग-१)/२०१७/आस्था-३

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.
तारीख: १४ नोव्हेंबर, २०१७.

शासन आदेश-

सार्वजनिक सेवेच्या हितार्थ महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने आणि उक्त अधिनियमाच्या कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्वमान्यतेने ग्राम विकास विभागातील श्री.ए.एस. सोनवणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता), जिल्हा परिषद, धुळे यांची उप संचालक (कृती संगम), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई या पदावर प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात येत आहे.

२. श्री.ए.एस. सोनवणे यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरीत स्वीकारावा व पदभार स्वीकारल्याचा दिनांक शासनास कळवावा. तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक : सीडीआर १०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

३. विभागीय आयुक्त, नाशिक / मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, धुळे यांनी श्री.सोनवणे यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यांच्या नियुक्तीच्या जागी तात्काळ रुजू होण्यास सांगावे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११४१५०६०५७४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Dattatraya Shinde

Digitally signed by Vijay Dattatraya Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fabf0ce38fdf553beb949764920592a97832b6399cb7060200d032e127e455f1, cn=Vijay Dattatraya Shinde
Date: 2017.11.14 15:32:48 +05'30'

(वि.द. शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
३) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
४) मा. सचिव (ग्राम विकास व पंचायत राज) यांचे स्वीय सहायक,
५) विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक,
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे,
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, ५ वा मजला, सिडको भवन (दक्षिण कक्ष), सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक,
९) महालेखापाल - १ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई,
१०) श्री.ए.एस. सोनवणे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता), जिल्हा परिषद, धुळे (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचेमार्फत.),
११) कार्यासन, आस्था-२, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
१२) निवड नस्ती (कार्यासन, आस्था-३), ग्राम विकास व जलसंधारण विभाग.